# उल्हासनगर महानगरपालिका

**जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/७६८/ २०२२**
**दिनांक :- १८ /०३/२०२२**

## बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय आरोग्य विभागासाठी बाहयस्त्रोताद्वारे स्टाफ नर्स, वॉर्डबॉय, औषधनिर्माता, प्रयोशाळा वैज्ञानिक अधिकारी व हॉस्पीटल मॅनेजर यांचा ठेका पध्दतीने पुरवठा करणेबाबत ई-निविदा क्र. २०२१_UMC_७५७२१५_१ दिनांक १४/१/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर ई-निविदेस मे.झा.पी. ॲण्ड कंपनी यांचे दिनांक २१/०२/२०२२ रोजीची लिगल नोटीस प्राप्त झाल्याने मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांना मा. आयुक्त यांचे दालनात मंगळवार दिनांक १५/०३/२०२२ रोजी सकाळी १०:३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी तसेच कंत्राटदार उपस्थित होते.

१. डॉ. राजा दयानिधी, मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
२. डॉ. करूणा जुईकर, मा. अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
३. श्री. अशोक नाईकवाडे, उप-आयुक्त् (मुख्यालय), उ.म.पा
४. श्री. अशोक मोरे, सहा. लेखा परिक्षक, उ.म.पा
५. श्री. अच्युत सासे, प्र. सहा. आयुक्त (साप्रवि), उ.म.पा
६. श्री. प्रेमचंद झा, मे.झा.पी. कंपनी, कंत्राटदार

उल्हासनगर महानगरपालिकेच्या ई- निविदा क्र. २०२१_UMC_७५७२१५_१ च्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे श्री. प्रेमचंद झा, झा.पी. कंपनी. यांनी मुद्दे उपस्थित केलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दा | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | दुसरा आर्थिक लिफाफा उघडण्यात आलेला होता सदर लिफाफयात मे. झा.पी. ॲण्ड कंपनी हे L१ असल्याचे दिसुन येत आहे. तरी सुध्दा त्यांना डावलून मे. शार्प सर्व्हिसेस, यांना L१ घोषित करण्यात आलेले आहे. सदर बाब चुकीची आहे. असे म्हणणे मांडलेले आहे. | संगणकीय प्रणालीस मानवी सुचनेप्रमाणे कार्य केले जाते. त्यामध्ये मे. शार्प सर्व्हिसेस यांनी दर A+B असा भरला होता. निविदा उघडण्यापुर्वी दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महानगर पालिकेस A+B असा दर भरला असून त्यांनी A ची रक्कम वजा करून B ची रक्कम ग्राहय धरण्याबाबत विनंती केली. सदर विनंती संगणकप्रणाली बाहय असल्याने ती संगणकीय प्रणालीवर परावर्तीत झाली नसल्याने दर एक समान असूनही मे. झा.पी. ॲण्ड कंपनी L१ दिसत आहे. मे. शार्प सर्व्हिसेस यांचे दि. २५/०१/२०२२ रोजीच्या पत्राची विनंती मान्य केल्यामुळे दोघांचे B चे दर एकसमान प्राप्त झालेले आहेत. |
| २. | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांना देण्यात आलेल्या गुणांकन हे चुकीचे असल्याचे श्री. प्रेमचंद झा यांचे मत आहे. दुसरा लिफाफा उघडण्याआधी कागदपत्रांची मागणी करणे आवश्यक होते असे मत मांडलेले आहे. त्यांनी सुनावणीच्या वेळेस कागदपत्रे सादर केलेली आहेत. | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी व मे. शार्प सर्व्हिसेस यांनी निविदेत नमूद केल्याप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात आली होती, त्याआधारे गुणांकन करून मे. झा.पी. ॲण्ड कंपनी व मे. शार्प सर्व्हिसेस या दोघांना दि. १८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.<br>त्यानंतर मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांची दि २१/०२/२०२२ रोजीची लिगल नोटीस प्राप्त झाली. त्यास अनुसरून दि. १५/०३/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत पुन्हा मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांनी कागदपत्र सादर केली ती यापुर्वी सादर केलेल्या कागदपत्रासमवेत पडताळली असता त्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. सबब यापुर्वी दिनांक १८/०२/२०२२ च्या पत्रान्वये करण्यात आलेले गुणांकन उचित असल्याचे आढळून आलेले आहे. |

आणखी मुद्दे नसल्याने बैठक समाप्त करणेत आली.

(डॉ. राजा दयानिधी, भाप्रसे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव —

१. अतिरिक्त आयुक्त
२. मुख्य लेखा अधिकारी, उ.म.पा
३. मुख्य लेखा परिक्षक, उ.म.पा
४. सहा. लेखा परिक्षक, उ.म.पा